ॐ

# अध्याय आठवा

१ पुसे किरीटी श्री-पतिप्रती ''कशासि म्हणती 'ब्रह्म'
'अध्यात्म' असें नांव कुणातें आणि काय तें 'कर्म' १

कशा प्रकारें असे वर्णिलें सांगा मज 'अधिभूत'
'अधिदैव' तसें म्हणती कवणा तें विवरावें येथ २

२ असे शरीरीं 'अधियज्ञ' कसा कोण केशवा, येथें
प्रयाण-कालीं संयमी मुनी जाणती कसा तूतें ?'' ३

३ वदे श्री-पति, ''तयासि म्हणती 'ब्रह्म' थोर अ-क्षर जें
विश्वीं भरलें तरी आगळें विश्वाहुनि जें सहजें. ४

शरीरासवें जन्म न पावे शरीर-लोपीं न च तें
लोपुनी जाई, सर्वां देहीं निज-सत्तेनें असतें ५

चैतन्य चि जें तयासि देती 'अध्यात्म' असें नांव
जाण निश्चिती सहज-स्थिति ती ब्रह्माची स्वयमेव. ६

आणिक कर्ता-कारण नसतां कार्य-रूप जी येथें
प्रपंच-रचना दिसे अर्जुना, म्हणती ‘कर्म’ तियेतें ७

४ दृष्टीस दिसे मनासि भासे जें जें रूप विनाशी
विकार-मय जें पार्था, म्हणती ‘अधिभूत’ असें त्यासी ८

आणि शरीरीं जीव-दशा जी ‘अधिदैवत’ तें जाण
ज्या तत्त्वातें सांख्य ठेविती ‘पुरुष’ असे अभिधान ९

मुळांत असतां शुद्ध बुद्ध जो माया-योगें बद्ध
होउनी शिणे संतोषे वा अहंकार-संबद्ध १०

असुनी देहीं शिवे न च जया देह-भाव अणुमात्र
‘अधियज्ञ’ असा तो नरोत्तमा, मी चि जाण सर्वत्र ११

‘अधिभूत’ तसें ‘अधिदैवत’ तें असें सकलही मीच
मुळीं अहंता लोप पावतां भेद-भाव नाहींच ! १२

५ प्रयाण-काळीं स्मरण राखुनी माझें त्यजुनी देह
गेला नर तो मला मिळाला ह्यांत न तिळ संदेह १३

देहीं असतां देह-भावना समूळ विलया गेली
देह ठेवितां तया नरातें चिंता अल्प हि नुरली १४

सहजें चित्ता आत्मरूपता आली अंतर्बाह्य
म्हणुनि तत्त्वतां मातें स्मरतां होतो मृत्यु सुसह्य १५

६ चित्तीं जो जो भाव राखुनी त्यजी कलेवर अंतीं
त्या त्या भावीं सदा रंगला तो पावे तत्प्राप्ति १६

७ म्हणुनि अंतरीं माझें चि करीं तूं निरंतर स्मरण
होईं विजया, सिद्ध लढाया त्यजुनी मायावरण १७
जरी स्व-जन हे कौरव तरि हें धर्म-युद्ध तूं जाण
म्हणुनि अर्जुना, देई दुर्जनां युद्धाचें आह्वान १८
अखंड मातें स्मरुनी करितां निज कर्तव्याचरण
शरीर जावो अथवा राहो मुळीं न तुजसी मरण ! १९
आणि तत्त्वतां मला अर्पितां मन-बुद्धी संपूर्ण
पावशील तूं मज सुनिश्चयें अशी वाहतों आण २०
८ नित्य चिंतुनी अभ्यास-बळें करुनी स्थिर चित्तातें
एकनिष्ठ तो योगी पावे परम दिव्य पुरुषातें २१
९ सर्वज्ञ चि जें पुराण सहजें गगनाहुनि जें सूक्ष्म
असे हि सकलाधार रूप जें विश्व-नियामक परम २२
तेजोमय जें ज्ञान-दीप्तिनें गिळोनियां अंधार
नित्य राहिलें जें अचिंत्य तें चिंतुनियां साचार २३
१० प्रयाण-कालीं चित्त जयाचें सुस्थिर शांत रहातें
तेविं अंतरीं भक्ति-भावना उचंबळुनियां येते २४
योग-बळें भ्रू-लता-संगमीं स्थिर ठेवी प्राणातें
असा स्वभावें योगी पावे परम दिव्य पुरुषातें २५
११ पद अविनाशी म्हणति जयासी 'अक्षर' वेद-ज्ञ मुनी
विरक्त योगी प्रयत्न करुनी प्रवेशती ज्या स्थानीं २६

जें साधावें म्हणुनी भावें ब्रह्मचर्य आचरिती
तत्त्व-सार तुज तें चि सांगतों बहु दुर्लभ जें जगतीं २७

१२ नव हि द्वारें मिटुनी हृदयीं सुस्थिर करुनी मन तें
योग-धारणा-बळें मस्तकीं ठेवी स्व-प्राणातें २८

१३ एकाक्षर ॐ ब्रह्म जप मुखें करी स्मरुनियां मातें
देह ठेवुनी जाय असा तो पावे परम गतीतें. २९

१४ स्मरती मातें अनन्य-चित्तें नित्य निरंतर पाहें
पार्था, योगी नित्य-युक्त जे तयां सुलभ मी आहें ३०

१५ मला भेटतां संत पावती संसिद्धीतें परम
पुनः न घेती दुःखपूर्ण जो नश्वर ऐसा जन्म ३१

१६ ब्रह्म-लोक हि प्राप्त जाहला जरी पूर्व-कर्मानें
न चुके पार्था, तरी सर्वथा पुनरपि येणें जाणें ३२

परि जे कोणी मला पावुनी देहें चि पर-ब्रह्म
होउनि गेले तयां संपलें जन्म-मृत्यूचें काम ३३

१७ युग-सहस्त्र तोंवरी एक तो ब्रह्मदेव-दिन जाण
तशी तेवढी रात्र जाणती अहोरात्र-विद् पूर्ण ३४

अशा चि एका दिनांत चौदा इंद्र होऊनी जाती
म्हणुनी ज्ञाते नश्वर गणिती स्वर्ग-लोक-संपत्ति ३५

१८ असो असा हा दिवस उगवतां कल्पारंभीं भूतें
प्रकृतिपासुनी जन्म पावुनी येती व्यक्त-दशेतें ३६

दिन मावळतां तीं चि पुनरपि प्रहर लोटतां चार
त्या अव्यक्तीं विलीन होती निशा-समयिं साचार ३७

१९ विलीन होती पुनःपुन्हां तीं परतंत्र अशीं भूतें
दिनान्तीं तशीं कल्पारंभीं पावती चि जन्मातें ३८

२० त्या अव्यक्त प्रकृतिहूनि तें असे थोर अव्यक्त
दुजें तत्त्व तें नित्य राहतें गिळुनी व्यक्ताव्यक्त ३९
नाश पावतां सकल हि भूतें जें न पावतें नाश
नित्यानित्यातीत असे तें स्वतःसिद्ध अविनाश ४०

२१ विश्वीं भरलें विश्व जाहलें जरी तें चि संपूर्ण
तरी लोपतां विश्व तत्त्वतां तें न लोपतें जाण ! ४१
त्या अव्यक्ताक्षर तत्त्वातें 'परम गति' असें म्हणती
पावतां चि मत्परंधाम तें जन्म-मरण ना पुढती ४२

२२ भूत-मात्र तें ज्यांत राहतें जगत् व्यापिलें ज्यानें
परम पुरुष तो सुलभ्य होतो एकनिष्ठ-भक्तीनें ४३

२३ तरी अर्जुना, योग-साधना करितां साधक-जन ते
कसा केधवां देह ठेवुनी जाती परम गतीतें ४४
अथवा घेती जन्म मागुतीं कसा केधवां त्यजुनी
देह आपुला तो काळ तुला सांगतसें विवरोनी ४५

२४ अग्नि ज्योति प्रकाश देहीं शुक्ल पक्ष षण्मास
उत्तरायणांतील साधुनी त्यजी देह दिवसास ४६

तो चि पावतो ब्रह्म जाणुनी मोक्ष-सिद्धि-सदनातें
'देवयान-पथ' असा वर्णिला तो तुज कथिला येथें ४७

२५ आणि शरीरीं प्रयाण-कालीं कफ-वातादिक दोष
कोप पावती शुद्धि जाउनी होतो बुद्धि-भ्रंश ४८

तदा अंतरीं सर्वतोपरी धूर माजतो जाण
सावधपण ना मरण सर्वथा कोंडुनि राहे प्राण ४९

स्थितींत ऐशा बाहेर निशा कृष्ण-पक्ष षण्मास
जाय दक्षिणायन हि जोडुनी तरी चंद्र-लोकास ५०

पावुनि येथें पुनश्च परते साधक-जन संसारीं
'पितृयाण-पथ' असा वर्णिला सावधान अवधारीं ५१

२६ प्रकाश-मय तो असे पांडवा 'शुक्ल-पथ' ज्ञानाचा
अंधकार-मय 'कृष्ण-पथ' दुजा जाणें अज्ञानाचा ५२

पंथ मानिले असती जगतीं असे सनातन दोन्ही
एकें पावे मोक्ष दुजानें पडे बंधनीं प्राणी ५३

२७ असे जाणुनी पथ हे दोन्ही योगी मोह न पावे
म्हणुनि भारता, सदा सर्वदा योग-युक्त तूं व्हावें ५४

होऊनि राहे ब्रह्म जो स्वयें त्या सोऽहं-सिद्धातें
ज्ञान-बळें न च पडे सांकडें मार्गामार्गीं येथें ५५

भलत्या ठायीं भलत्या काळीं राहो जावो देह
जाणें नित्य ब्रह्म-रूप तो योगी निःसंदेह ५६

२८ वेदाध्ययनीं यज्ञीं दानीं तपाचरणही करुनी
पुण्य-फळ मिळे तें तें सगळें ओलांडुनियां ज्ञानी ५७

आत्म-समरसें परात्पर असें आद्य अनादि स्थान
सहजें पावे तो सम-भावें पद ब्रह्म-निर्वाण !'' ५८

निवेदिला असे ज्यांत अक्षर-ब्रह्म-योग तो ।
येथें भावार्थ गीतेचा अष्टमाध्याय संपतो ॥ ८ ॥